आकाशवाणी पुणे

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ११/०५/२०२४ वार – शनिवार

मावळ, पुणे आणि शिरूर लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान होणार असल्यानं या दिवशी संबंधित मतदार संघात राज्य शासनानं सुटी जाहीर केली आहे.

मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी मतदार संघांच्या बाहेर असतील, त्यांना तसंच राज्य आणि केंद्र शासन, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम आणि इतर प्रतिष्ठान आदींना ही सार्वजनिक सुटी लागू राहील.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिसरासाठी पुण्याचे जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

दरम्यान, जिल्ह्यातल्या तीनही मतदारसंघांमध्ये मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असून जास्तीत जास्त संख्येनं नागरिकांनी मतदान करावं, असं आवाहन त्यांनी पुण्यातल्या पत्रकार परिषदेत केलं.

उन्हाळ्यातील वाढतं तापमान लक्षात घेऊन निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी तसंच मतदारांसाठी २ हजार ६९१ प्रथमोपचार पेट्या आणि प्रत्येक मतदान केंद्रासाठी १० ओआरएस पाकिटांचं वितरण करण्यात आलं आहे. अधिकारी आणि कर्मचारी यांना अपघात झाला किंवा काही दुर्घटना घडल्यास त्यांना तत्काळ वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश बदलत आहे. देशाची अर्थव्यवस्था भक्कम करून देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज आहे म्हणून भाजपच्या मागे खंबीरपणे उभे राहा असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी नातूबाग मैदानावर आयोजित जाहीर सभेत आज केलं. काँग्रेसनं साठ वर्षात जे काम केलं नाही त्याच्या तिप्पट काम गेल्या दहा वर्षात

आपल्या सरकारनं केलं आहे. काँग्रेसकडं विकासाचा कोणताही मुद्दा नाही. त्यामुळे भाजपला संविधान बदलायचे आहे असा अपप्रचार त्यांनी चालू केला आहे, जातीचं राजकारण करायला सुरुवात केली आहे, अशी टीका गडकरी यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज पुण्यातल्या जाहीर सभेत बोलताना लोकशाही टिकवायची असेल तर नेहरू आणि गांधींचे विचार भक्कम करायला पाहिजे असं सांगितलं. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ हडपसर इथं आयोजित जाहीर सभेमध्ये ते बोलत होते. पूर्वी निवडणुका दोन ते तीन टप्प्यांमध्ये होत होत्या मात्र आता सहा ते सात टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत. ही बाब निवडणूक आयोगावर संशय निर्माण करणारी असल्याचंही पवार म्हणाले.

लोकशाहीला वाचवण्यासाठी ही निवडणूक आहे असे मत काँग्रेसचे नेते अभिषेक मनू संघवी यांनी आज पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित वार्तालाप कार्यक्रमात व्यक्त केलं. जे सरकार 272 संख्येमध्ये होणार आहे त्यांना 400 पार कशासाठी हवे आहेत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

एसटीच्या १६ ई शिवनेरी बसगाड्या आता अटल सेतूमार्गे धावणार आहेत. त्यामुळे पुणे - मुंबई- पुणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा वेळ 45 मिनिटांनी वाचणार आहे.

पावसाच्या पाण्याचा निचरा प्रभावीपणे होण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या नाल्यांची स्वच्छता करण्याचं काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतल्या १४४ नाल्यांची स्वच्छता करण्याचं काम सध्या सुरू आहे.

पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात आपत्कालीन वैद्यकीय कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षात गेल्या पाच महिन्यांत ६१८ रुग्णांवर आपत्कालीन स्थितीत उपचार करण्यात आले आहेत.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं दिलेल्या माहितीनुसार यंदा जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांच्या कालावधीत पुणे शहर आणि परिसरात एकंदर १ हजार १८३ अपघात झाले असून त्यात २२१ जणांना आपला प्राण गमवावा लागला. शहरी भागापेक्षाही शहरालगतच्या ग्रामीण भागातील अपघातांच्या संख्येत वाढ दिसून आली आहे.

१२ वर्षाखालील वयोगटासाठीच्या एसए अजिंक्यपद करंडक आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत मुलींच्या गटात सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमीने वॉव् क्रिकेट ॲकॅडमीचा १३ धावांनी पराभव केला. तर मुलांच्या गटात अष्टपैलु क्रिकेट ॲकॅडमीने सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमीचा ११२ धावांनी पराभव केला.

पुणे आणि परिसरात उद्या गडगडाटी पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान मात्र 39 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.